# ॥ चैतन्य लहरी ॥



परमपूज्य माताजी श्री निर्मलादेवी

अंक क्र. १

वर्ष १९९३ - ९४

## आत्मसाक्षत्कारी जीव व ज्यांना आत्मसाक्षात्कार मिळाला नाही अशा लोकांमधील फरक

ज्या अधिकार वाणीने तुम्ही लोकाशी बोलाल त्याच्या वरून लोकांच्या लक्षात येईल तुम्हाला हे मिळाले आहे.एक आत्मसाक्षात्कारी जीव व ज्याला तो मिळाला नाही. यांच्यांत मूलभूत फरक हा आहे की तो स्वत:ची दु:खे सांगत नाही किंवा परमेश्वराच्या विरहा बद्दल बोलत नाही तो म्हणतो. "मला आता ते मिळाले आहे. तेच हे आहे" उदाहरणार्थ येशू ख्रिस्त म्हणाले होते. "मी प्रकाश आहे. मी मार्ग आहे" इतर लोकही हे म्हणू शकतील परंतु ते सत्य नाही हे तुमच्या लक्षात येइल.

-- श्री माताजी

# “सहस्त्रार दिन”
## (सहस्त्रार दिवस, ५ मे, १९८७ ऑस्ट्रेलिया)

आजचा दिवस सर्व सहज योग्यांसाठी फार महान आहे. फार पूर्वीपासून माझी इच्छा होती की आता सहस्त्रार उघडले पाहिजे पण योग्य वेळ येई पर्यंत मी वाट पहात होते.कारण योग्य वेळी ते करणे महत्वाचे होते.

औरंगाबाद मध्ये एका लहान मुलाने मला प्रश्न विचारला, "श्री माताजी, ब्रह्मचैतन्याची सर्व व्यापक शक्ती सर्व ज्ञानेंद्रियांच्या (senses) पलिकडची आहे. व त्यांच्या माध्यमातून तिची जाणिव होऊ शकत नाही तर मग आता ती कशी काय जाणवते ? हा प्रश्न त्याने मला विचारला तोच आता मी तुम्हाला विचारते,

या पूर्वी, ज्यांना साक्षात्कार झाला होता ते, जसे तुम्ही आता त्याबद्दल बोलू शकता की, आम्ही ते आमच्या जाणीवेत अनुभवतो, तसे सांगू शकत नव्हते ते त्याचे स्पष्टीकरण देवू शकत नव्हते, अनुभवात घालू शकत नव्हते.त्यांनी ते जसे एखाद्याने आंब्याची चव शब्दात सांगावी तसे शब्दांनी सांगण्याचा प्रयत्न केला.आंब्याची चव तो खाल्याशिवाय समजत नाही. मग तुम्ही कितीही सांगा की, फार उत्तम आहे, महान आहे इत्यादी.तेव्हां आता काय झाले आहे हा प्रश्न आहे. याशिवाय पूर्वीचे संत होते, ते शेवटी कंटाळले.ज्ञानेश्वरांनी वयाच्या एकविसाव्या वर्षी समाधी घेतली,एका खोलीत जाऊन ते तिथे बसले व समाधी घेतली व देह सोडला.त्यांनी उपमा दृष्टांत देऊन ते सांगण्याचा प्रयत्न केला.ख्रिस्तांनी स्वत:ला क्रूसावर चढवून घेतले. हे कशामुळे झाले. इतके ते निराश का झाले? तर हे गुढ काय आहे ते कोणी तुमच्यापैकी सांगू शकतय का ?

उत्तर सोपे आहे पण पचनी पडायला अवघड आहे. ते म्हणजे या पूर्वी जे अवतार पृथ्वीवर झाले ते सहस्त्राराचाभाग आहेत.ते ब्रह्मचैतन्याचा भाग होते.ते आदिशक्तिचा भाग होते. ते पृथ्वीवर आले व अशा लोकांना आत्म साक्षात्कार दिला की जे फार उच्च दर्जाचे लोक होते, की ज्यांना काहीच समस्या नव्हत्या, जणू काही ते अवतार प्रेमाच्या महासागरातून आले व लोकांना त्या प्रेमाच्या महासागरात व त्याचा आनंद घेण्यासाठी घेऊन गेले. जसे कबीराने सांगितले की, "जब मस्त हुए तो क्या बोले" म्हणून बऱ्याच लोकांनी मौन धारण केले.ते त्या प्रेमाच्या महासागरात पूर्णपणे विरघळून गेले.पण तुम्हाला तसे झाले नाही.तुमच्यात काहीतरी विशेष घडले आहे.

तर, संपूर्ण ब्रह्मचैतन्य प्रेमाच्या संपूर्णमहासागराने एका एगाचे रूप घेतले आहे व ते म्हणजे आदिशक्ति तुमच्यावर चैतन्याचा वर्षाव करण्यासाठी तुम्हाला जोपासण्यासाठी तुम्हाला मोठे करण्यासाठी, पृथ्वीवर

अवतरली आहे व तेही आपल्या प्रेमचा अविष्कार करुन तुम्हाला आदिशक्तीच्या शरीरात धारण करण्यासाठी गंगेच्या पाण्यात एखादा घडा असावा तसे तुम्ही आदिशक्तिच्या शरीरात एखाद्या पेशी प्रमाणे आहात व तुमचे व्यक्तित्व, वयक्तिमत्व यांचा सांभाळ केला जात आहे,तरीसुध्दा तुम्हाला तुमच्या ज्ञानेंद्रियांच्या (senses) माध्यमामधून ब्रह्मचैतन्याची जाणीव होऊ लागली आहे व शिवाय दुसऱ्यालाही तुम्ही आत्म साक्षात्कार देऊ शकता पण तुम्ही आदिशक्तिच्या शरीरात आहात जोपर्यंत तुम्ही आदिशक्तिच्या शरीरात आहात तोपर्यंत तुम्ही हे सर्वकाही करू शकता.

तर अशी महान घटना घडली आहे की, सर्व सहस्त्रार ज्या अंतर्गत असलेल्या देवतांच्या सात पीठांसकट उघडले आहे.हे सर्व संपूर्ण तुमच्या आईच्या रूपात आली आहे, जी अतीशय नम्र आहे, खेळकर आहे व महामाया आहे. ही घटना सर्व मानव जातीच्या दृष्टीने व संपूर्ण विश्वाच्या दृष्टीने अतिशय महान आहे कीं, तुम्ही आत्मसाक्षात्कार घेऊ शकता, दुसऱ्याला देऊ शकता, ब्रह्मचैतन्य अनुभूति घेऊ शकता, तर्काने समजू शकता व दुसऱ्याला समजावू शकता.

हेच उदाहरण घ्या ही जी फुले दिसत आहेत ती ज्या लोकांनी आणली त्यांच्या उष्णतेमुळे मरुन गेली होती, मी फक्त त्यांच्यावर चैतन्य लहरी मिश्रीत पाणी शिंपडले, आता बघा ती कशी टवटवीत दिवस आहेत,ब्रह्मचैतन्यानें त्यांना पुन्हा ताजे तवाने केले आहे, तुमचे तसेच आहे, तुम्ही कसे ताजे व सुंदर दिसत आहात. सहजयोगी कोणीही ओळखू शकतो. या सर्व परिस्थितीत, आपण एक गोष्ट जाणली पाहिजे की काही मर्यादा आपल्याला पाळणे आवश्यक आहे, सर्वांत प्रथम की, मी तुम्हाला माझ्या शरिरात धारण केले आहे, म्हणजे एखादी बाहेरची वस्तु (foreign things) शरीरात घेणे, ती सांभाळणे व वाढविणे, पण जर तुम्ही त्रासदायक झालात तर मी ते सहन करु शकत नाही व तुम्हाला बाहेर फेकावे लागते, काही लोक फारच त्रासदायक असतात,ते ध्यान करत नाहीत,ध्यानाच्या त्यांच्या काही विशिष्ट कल्पना असतात,ते सूज्ञ होत नाहीत,भूत किंवा भविष्य काळातच रममाण होऊन राहतात.

उदा.मी तुम्हाला नाकात तूप सोडायला सांगितले होते, ती अगदी साधी गोष्ट आहे पण महत्वाची आहे कारण तुमचे हंस चक्र फारच खराब आहे व एडस्च्या रोगाचे एक लक्षण म्हणजे खराब झालेले हंस चक्र. तुम्हाला एडस्च्या रोगाचा धोका आहे, पण ही साधी गोष्ट सुध्दा पाळली जात नाही.

मी काय सांगते ते ऐकणे हे तुमचे धार्मिक कर्तव्य आहे,तुम्ही माझ्या आज्ञा पाळल्या पाहिजेत माझे हात, माझी बोटं, माझे पाय माझ्या आज्ञा ऐकतात मग तुम्हाला मी मोठे योगी बनविले, मान सन्मान दिला, आदिशक्तिच्या शरीरात धारण केले व माझ्या शरिरात तुम्ही पेशी आहात तर मग तुम्ही का नाही पाळत ?

सर्वांत प्रथम म्हणजे अशा प्रकारचा प्रयोग करणे, बाहेरच्या वस्तुला शरीरात धारण करणे, म्हणजे फारच धाडसाचे काम आहे व कृती धोकादायक आहे, फारच प्रेमाने, कारूण्याने, पेशन्स ठेवून व सर्वांत महत्वाचे म्हणजे अतिशय मेहनत करुन हे साध्य करावे लागते, तेव्हा, मी सहस्त्रार उघडले आहे,ही सर्वांत महान घटना आहे हे लक्षात घेतले पाहिजे, अर्थात मी सहस्त्राराची स्वामिनी आहे व सर्व चक्रांची स्वामिनी आहे पण मी सर्व चक्रांच्याही पलिकडे आहे, फारच पलिकडे आहे, जर अशी परिस्थिती आहे तर तुमच्या सहस्त्राराची काळजी घेणे फारच महत्वाचे आहे, म्हणजे माझी व तुमच्या स्वतःच्या हृदयाची जे तुमच्या सहस्त्रारात ब्रह्मरंध्र पीठ आहे व जे तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळाल्यांनतर उघडले जाते.

सहजयोग सगळ्या बाजूने पसरत आहे पण त्याची उंची वाढली पाहिजे व तुम्ही मी कोण आहे हे जर योग्य प्रकारे समजून घेतले तर सहस्त्रार सहजच स्वच्छ राहील,सहस्त्रार स्वच्छ ठेवण्यासाठी मी जे काही सांगते ते तुम्ही मानले पाहिजे व मी दैवत आहे हे जाणून माझ्या सांगण्याचे पालन केले पाहिजे.

सहस्त्रार स्वच्छ ठेवण्यासाठी तुमचे हृदय उघडले पाहिजे. तुमचे हृदयच जर उघडले नाही तर माझ्या प्रेमाने मी ते कसे भरणार ? तुमचे योगी बंधू भगिनींसाठी तुम्ही हृदय उघडे केले पाहिजे. मागे तुमच्या बाबतीत घडलेल्या घटनेमुळे जर तुम्ही चिंतीत असाल तर अशा घटना सहजयोगात घडणार नाहीत. ते अशा तऱ्हेने घडविले आहे. जर एक हात दुखत असेल तर त्याची काळजी घ्यायला दुसरा हात आहे. तुम्ही काही एकटे नाही. तुम्ही सामुहिकते (collective being) च्या शरीरात आहात जर कोणी मूर्ख व बावळट लोक असतील तर अशांच्यासाठी सहजयोग नाही. संस्कृतीमध्ये त्यांना "मूढ" म्हणतातत्तसेच जे अतिशहाणे असतील व स्वत:ला फसवायचा प्रयत्न करत असतील अशांसाठी सुध्दा सहजयोग नाही. मानवी बुध्दीमध्ये कसेही फिरण्याची क्षमता आहे. तसेच जे लोक असहजपणे वागत असतील त्यांच्यासाठी पण सहजयोग नाही. हळू हळू त्यांच्या चैतन्य लहरी जातील व तुम्ही आजारी पडाल. तुमच्यापुढे समस्या येतील व तुम्ही अडचणीत याल. ही तुम्हाला वॉर्निंग नाही तर विनंती आहे कारण तुम्ही माझ्या शरीरात आहात. जेव्हा जेव्हा कोणी माझ्या शरीरात राहून मला त्रास देतो तेव्हा मला तो सहन करावा लागतो. मला फारच हाल सोसावे लागतात. हा फारच विचित्र स्वरुपाचा सुळावर चढविण्याचा प्रकार आहे. ज्यामध्ये प्रत्येक क्षणाला, ज्याला हवे असेल तसे तो मला त्रास देऊ शकतो. मला छळण्यासाठी सहजयोग्यांच्या हातात सर्व कायदे आहेत. तसेच त्यांची ही क्षमता आहे. शक्ती आहे की ते निरंतर माझ्या हृदयात राहू शकतात. तुमची हृदये उघडा. आता आपली हृदये कशामुळे बंद राहतात हे पाहिले पाहिजेप्रहिले म्हणजे मागे घडलेल्या गोष्टींच्या भितीमुळे आपले हृदय बांधलेले राहते. जर वाईट अनुभव आला असेल, तर असे लोक फारच घाबरलेले असतात.

मी पाहिलय आणि मला फार आश्चर्य वाटलं की इग्लंडमध्ये. एक दिवस सुदैवाने किंवा दुर्दैवाने प्रथमच फार बर्फ वृष्टी होत होती आणि त्या दिवशी आम्ही दुसरीकडे (shift) हलणार होतो. म्हणून मला बाहेर जायचे होते. मी जातानापाहिले की एका स्त्रिच्या हातात लहान मूल होते व ती दरवाज्यात उभी राहून दुसऱ्या स्त्रिशी बोलत होतीदुसरी स्त्री घराच्या आत उभी राहून, दरवाजा अगदी थोडासा उघडून व चेन तशीच ठेवून तिच्याशी बोलत होती. मी पुन्हा अर्ध्यातासाने परत आले तरी, ती स्त्री तशीच बर्फात उभी होती व आतली स्त्री तशीच आतूनच बोलत होती. मला आश्चर्य वाटले हा (Mid Summernight Dream) सारखा प्रकार काय चालू आहे ? ह्या आतल्या स्त्रीला लहान मूल घेतलेल्या स्त्रीची एवढी भीती वाटायचे काय कारण होते. त्याचे कारण म्हणजे तुमच्या मधला अहंकार तुम्ही दुसऱ्यावर प्रभुत्व गाजविले दुसऱ्याला छळले व ह्या सर्वांमुळे तुमच्या मनांत भिती निर्माण झाली की, दुसरे ही तुम्हाला तसेच वागवतील. नाहीतर इतके दुसऱ्याला घाबरुन दरवाजे बंद करुन घेण्यासारखे काय आहे? दुसरे म्हणजे तुम्हाला कोणीतरी छळले असेल व म्हणून तुमचे हृदय बंद झाले आहे. त्यामुळे दुसऱ्यासाठी तुम्ही तुमचे हृदय उघडू शकत नाही. दुसऱ्याला त्रास दिल्यामुळे तुम्ही गप्प बसता ? एखाद्या प्रेतासारखे नुसतेच पहायचे.

समजा मी अशी असते तर सहजयोगाची व सहस्त्राराची ही गुपीत तुम्हाला कोणी सांगितले असते ? असा स्वभाव ज्या लोकांना मागे कोणीतरी घाबरविले असेल त्यांचा अथवा ज्यांनी आपल्या खराब विशुध्दी चक्रामुळे इतरांना घाबरविले असेल अशांचा होतो.

आक्रमकता हा पश्चिमेकडे आणखी एक स्वभाव धर्म आहे. तो तुम्ही लोकांनीसुध्दा उचलला आहे. कोणतीही जबाबदारी तुमच्यावर सोपविली की लगेच तुम्ही आक्रमक बनता. माझ्या आत मला हे सहन होत नाही समजा मी एखादे औषध घेतले व त्याच्यामुळे माझ्यातल्या काही पेशी फार आक्रमक झाल्या तर काय होईल ? शेवटी मी कॅन्सरची रुग्ण होते. आक्रमक पेशींनाच घातक पेशी म्हणतात. अशा पेशी तुमच्याकडे व्यवस्थित लक्ष्य देत नाहीत, उत्तम आरोग्य देत नाहीत व तुम्ही दुसरे काही नाही तर घातक पेशी होता

जिव्यागुळे कॅन्सरचा प्रादुर्भाव होतो, कॅन्सरचे रुग्ण होता, अशी व्यक्ति सहजयोग्यांमध्ये कॅन्सर पसरविते. काही स्त्रीया व पुरुष कसे आक्रमक होते ह्याच्या मी कितीतरी भयंकर गोष्टी ऐकल्या आहेत, एखादे लहान पद तुम्ही एखाद्या व्यक्तिला द्या लगेच ती आक्रमक होते समजा एखाद्या व्यक्तिला लिडर केले, लगेच तिच्या नवऱ्याला किंवा बायकोला वाटायला लागते की, मी किंवा तिचा नवरा जणू काही पंतप्रधान किंवा तशी व्यक्ति झाली आहे.हा आक्रमकपणा दुसऱ्याला आक्रमक बनवितो तुम्ही एक म्हणता मग दुसरा काहीतरी म्हणतो अशी प्रतिक्रिया सुरू होते, आपल्यात स्वतःचे असे काहीच नाही का ? की आपण प्रतिक्रियाशील होतो. कुठल्याच गोष्टीची प्रतिक्रीया होता कामा नाही. आपल्याकडे स्वतःचे काहीतरी असेल तर आपल्यामध्ये दुसऱ्याने आपल्याला काही सांगितले किंवा केले तरी त्याची प्रतिक्रीया होता कामा नये, ते सर्व तिथल्या तिथे संपले पाहिजे.

तुमची हृदये उघडा, म्हणूनच तुम्ही भारतात आल्यावर पाहिले असेल की विशेषत: इंग्रज लोकांबद्दल किंवा पोर्तुगिज लोकांबद्दल त्यांच्या हृदयात कोणताही राग नाही, उलट त्यांना किती प्रेम आदर वाटतो कारण ते, तुम्ही त्यांच्यासाठी चांगल काय केलं हे पाहातात. एकदा काही ब्रिटीश लोकांनी हायकोर्टाला भेट दिली. लगेच त्यांची भेट साजरी करण्यासाठी हायकोर्टाला सुटी देण्यात आली, पण तुम्ही जर इंग्लंडला गेलात तर ते तुम्हाला मारतीलच व हाकलून देतील, तर हा आक्रमक स्वभाव तुमच्या हृदयातून गेला पाहिजे, अगदी गेला पाहिजे, माझ्या शरीरात आक्रमक लोकांसाठी बिलकुल जागा नाही, मी कधीही तुमच्या बरोबर आक्रमक पणाने वागले नाही व तुम्ही ही माझ्याशी आक्रमक पणाने वागू नये, जर तुम्ही एखाद्या सहज योग्याशी आक्रमकतेने वागलात तर तुम्ही माझ्याशी आक्रमक झालात, पण असे लोक इतरांशी आक्रमक नसतात, जसं वाईट नवरा बायकोशी आक्रमक असतो, इतरांशी नाही, जे सहजयोगी नाहीत त्याच्याशी ते आक्रमक नसतात.

हा सहस्त्राचा फार मोठा भाग आहे, कारण अहंकार सहस्त्राराचा फार मोठा भाग व्यापतो, तमचे सहस्त्रार जर ह्या अहंकारामुळे व्यापले गेले तर मी तुम्हाला किंवा मला स्वतःला सुध्दा काय मदत करू शकणार ? इतके लोक तुम्ही माझ्या शरीरात फास्ट सर्क्युलेट होत असता व बहुतेक माझ्या हृदयात राहण्यासाठी धडपडत असतात पण ते माझ्या इगोमध्ये जाऊन बसतात, परंतु मी निरहंकारी आहे कारण माझ्यात (प्रतिक्रिया) नाही जर प्रतिक्रिया नसेल तर अहंकार वाढणार नाही, मी माझ्या शांती व वैभवात राहून सहजयोग घडवत असते मी प्रतिक्रिया व्यक्त करीत नाही पण तुमच्या प्रतिक्रियेचा मला त्रास होतो कारण तुम्ही माझ्यात आहात.

दुसरा भाग लहानपणापासून असलेल्या भितीमुळे बनतो, अमेरीकनसचे मला माहित नाही पण पुष्कळ अमेरीकन लोक माझ्याकडे आले होते ते अगदी वेडे होते, त्यांच्यात काहीच (Normal) नव्हते, ते एकतरबोलणारच नाहीत किंवाअसंबध्द बोलतील व काहीच समजणार नाही, फ्रेंच लोकांचे ही तसेच आहे. मला वाटते, जगात दुसऱ्या कोणाला वेड लागण्याच्या आधी फ्रेंच लोक वेडे झाले असावेत, अगदी वेडे लोक. त्याची एकही गोष्ट सरळ नसते, प्रत्येक गोष्ट उलटी असते, जेव्हा आपण भारतीय टेलिफोनला नावे ठेवतो, तेव्हां ते फ्रेंच लोकांनीच बनविले आहेत हे जाणले पाहिजे, मी नेहमी म्हणते की पुण्यातील टेलिफोन पाहण्यासाठी असतात कारण त्याला पुण्यपटणम् म्हणतात, म्हणजे पुण्याचे शहर आणि त्या टेलिफोन मधून फक्त परमेश्वरच ऐकू शकतो पण परमेश्वर सुध्दा ऐकू शकत नाही, तेव्हा अशा प्रकारचा अर्धवटपण किंवा वेडेपणा अथवा आक्रमक स्वरूपाचा वेडेपणा हा अहंकार प्रति अहंकाराच्या पातळीवर गेल्याने येतो, आणि प्रथम त्यांच्यात "ह्यात काय चुकले ?" अशी प्रवृती निर्माण होते, व नंतर जेव्हा बोलतात तेव्हा ते भांडत असतात आणि काही काळानंतर त्यांच्यातील आक्रमकता अगदी दिसून येते आणि मग

असे होते की त्यांची डोकी फिरली आहेत. अमेरिकन लोकांमध्ये हे सगळीकडे आहे ते बोलत असतात तेव्हा एकही चांगला अमेरिकन सापडणार नाही की, ज्याच्याचेहऱ्याचा किंवाशरीराचा एखादा भाग विचित्रपणे हालत नाही.प्रत्येक ठिकाणी त्या (what's wrong) (त्यात काय बिघडले) च्या प्रकारामुळे कितीतरी नाड्या ताणलेल्या असतात आणि मग ते प्रत्येक गोष्ट स्वत:च ठरविण्याच्या अंतिम अवस्थेपर्यंत जातात.ह्याची पार्श्वभूमी अशी आहे की, एक भूत, मोठे भूत, फार मोठे भूत आणि ते भूत भूतकाळातलं अथवा भविष्य काळातलं नाही तर वर्तमानकाळातलं आहे आणि ह्या भूताला मी भौतिकता म्हणते.

ही "भौतिकता" अतिशय भयंकर बाब आहे. ही अतिशय हास्यास्पद व लाजीरवाणी गोष्ट आहे जी मानवाला शोभून दिसत नाही.कुत्रासुध्दा ह्या भौतिकतेचा तिरस्कार करेल. मानव कोणत्या पातळीला येऊन पोहोचला आहे.ही भौतिकता माणसाला अत्यंत निर्लज्ज बनविते. एखाद्या स्त्रीला "तुमच्याकडे माझा चमका आहे का ?" असे विचारताना लाज सुध्दा वाटत नाही. भारतात, आम्ही लहान असताना आम्हाला सांगायचे, म्हणजे ती आमची संस्कृती आहे, जर एखाद्याची वस्तु आपल्याकडे असेल तर आपण ती सांभाळली पाहिजे व परत केली पाहिजे आणि जर आपलाहिरा जरी दुसऱ्याकडे असेल तरी तो मागायचा नाही. हा चांगला शिष्टाचार नाही.हिरा हा महत्वाचा नसून काय महत्वाचे आहे तर चांगले संबंध, मैत्री व दुसऱ्यांच्या भावनांची कदर तुम्ही असं कसं विचारू शकता? जर त्यांना हिरा सापडला असता तर त्यांनी तो परत केला असता. त्यांनी जर काही विचारलेच नाही याचा अर्थ हिरानाही आणि तो जरी असता तरी हिरा म्हणजे काय? तुम्ही घातला काय किं वा त्यांनी घातला काय, काय फरक पडणार आहे?

माझ्या वडिलांच्या घराची दारे सतत उघडी असायची, दिवसरात्र उघडी असायची.ज्या अर्थी घराची दारे उघडी आहेत त्याअर्थी घरात काहीच मौल्यवान वस्तु नसतील असा विचार करून कधीच चोर येत नसे. आमच्याकडे फक्त एकदाच चोरी झाली आणि चोराने फक्त ग्रामोफोन व काही रेकॉर्डस पळवून नेल्या माझे वडील म्हणाले की त्याला संगीत आवडतं असावं म्हणून त्याने योग्य वस्तु नेली.तेव्हा आता पोलिसांना कळविण्यात काय अर्थ आहे ?

म्हणून ही भौतिकता एखाद्या पिसाळलेल्या कुत्र्यासारखी आहे आणि हा रोग सगळ्यात वाईट रोगापेक्षाही भयंकर आहे.लोक किती त्याच्या आहारी जातात! तुम्हाला असे (डॉक्टर) माहित असतील की जे एखाद्या क्षुल्लक रोगासाठी तुमचे दात, डोळे, नाक पैसे सर्वकाही काढून घेतात. उदा. मलेरियासारखा रोग किंवा कुठलाही रोग हा रोग तुमच्यातील सर्व सुंदरता, चांगलेपणा नष्ट करतो काढून घेतो.

उदा. या भौतिकतेमुळे अनेक फॅशन्स सुरू झाल्या आहेत.स्त्रियांवर याचा लवकर परिणाम होतो.लांब बाह्या घालण्याची फॅशन निघाली होती, भारतात सुध्दा सुरू झाली आहे. नंतर त्या लहान केल्या, अर्ध्या केल्या, नंतर त्या अजिबात राहिल्या नाहीत. मी म्हणते की " ह्या शर्यतीत मी धावणार नाही, माझ्या नेहमीच एकाच प्रकारच्या बाह्या असतात त्यामुळे मी त्याचा विचार करत नाही. मला हव तसं माझा शिंपी शिवू शकतो कारण त्याला माहित आहे की मी एकाच प्रकारे शिवते", लोक फॅशनच्यामागे धावण्याची काय गरज आहे? आता एखादी नवीन शर्यत सुरू झाली, त्याच्या बरोबर पळायला लागले.दुसरी शर्यत सुरू झाली त्याच्या मागे धावायला लागले, तसरी शर्यत सुरू झाली त्याच्यामागे पळायला लागले,आणि ह्या फॅशनच्या निरर्थक शर्यती मागे सदा सर्वकाळ धावत असता आता डोक्याला तेल न लावण्याची एक नविन फॅशन सुरू झाली आहे त्यामुळे तुम्हाला टक्कल पडते आणि तुम्ही टोप खरेदी करता. हे सर्व धंदेवाईक लोक घडवून आणतात, हा धंदा आहे.आधी तुम्ही टकले व्हा व मग त्यांचकडून टोप विकत घ्या ! आता टोप स्वच्छ ठेवण्याकरिता वेगळे पैसे, वेड्यासारखे चालू असते ! आता दुसरा एक प्रकार, लंडनमध्ये आता एक नविन

फॅशन सुरू झाली आहे.कारण त्यांना पैसा मिळवायचा असतो.लोकांमध्ये एवढेसुध्दा समजण्याची किंवा तर्क बुध्दी राहिली नाही की जे पूर्वी काही ते शिकवत होते आज त्याच्या अगदी विरूध्द ते वागत आहेत. तुम्ही जुन्या फोटोत पहात असाल (Tail Coat) वापरत असत. तुमचे केस व्यवस्थित ठेवत असत, त्यानंतर (Three piece suit) आले, त्यानंतर घट्ट कपडे आले की ज्यामुळे काहींच्या रक्तवाहिन्यासुध्दा अरुंद होतात. आता तर अगदी सैल कपडे वापरण्याची फॅशन सुरू झाली आहे.एकदा तर मी पाहिले की एक स्त्री एका ब्लॅंकेट पासून तिचा पोशाख (Dress) तयार करत होती. मला वाटले ती एखादी (priest) किंवा दुसरी कोणी तरी असावी.इतका हा मूर्खपणा सुरू झाला आहे.

कल्पना करा, सहस्त्राराचा विचार करा ! परमेश्वराचा विचार करा ! आपण कोणत्या जगात चाललो आहोत ! ते मूर्ख लोक कोणत्या जगात चालले आहेत ! ते जग अगदी मूर्ख आहे जेथे लोक मूर्खपणाच्या गोष्टीमागे धावत असतात.हे बदलते जग एक डोकेदुखी आहे.कारण आता कोणती फॅशन आहे ह्याचा आपल्याला सतत विचार करावा लागतो.पेपरमध्ये शोधावे लागते की आता कोणती फॅशन चालू आहे.हे भूत तुमच्यात शिरल्यामुळे ही सर्व बनवा बनवी चालू आहे.

जेव्हा तुम्ही सहज योगात येता तेव्हा काळजी घ्या की भौतिकता तुमच्यात प्रवेश करणार नाही.ते महत्वाचे नाही.जेव्हा एखादी व्यक्ति मरण पावते तेव्हा मला नक्की माहित नाही, तुम्हाला काळे किंवा पांढरे कपडे घालावे लागतात. इंग्लडमध्ये माझ्या यजमानाचे जवळचे मित्र मरणपावले आणि माझ्याकडे पूर्णपणे काळी साडी नव्हती. आपल्याकडे अशी साडी नसते. मला समजत नव्हते काय करावे ? मी माझ्या यजमानांना सांगितले की " माझ्याकडे काळी साडी नाही" आणि ते म्हणाले "मग तू येऊ नकोस" विचार करा - मी जर त्यांच्या पत्नीकडे गेले नाही तर तिला काय वाटेल ? त्याचे काही नाही आणि महत्वाचे काय तर काळी साडी.

ही भौतिकता जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात तुम्हाला फसवते. तुम्ही ह्यात कसे अडकलात हेच मला प्रथम समजत नाही. आणि दुसरीकडून तीच लोकं तुम्हाला फसवितात." बरं. हे काही बरोबर नाही.आता हे फार झालं. तेव्हा असंस्कृती काढा. असंस्कृती हा आणखी एक भौतिकतेचा प्रकार आहे.आणखी एक वेडेपणा आहे. लंडन मध्ये सध्या असंस्कृती चळवळ चालू आहे.ज्यांना पंक्स म्हणतात म्हणजे असंस्कृतीची चळवळ म्हणतात. कदाचित आता हे कालबाह्य झाले असेलत. मला वाटत. पण सध्या तरी पंकस दिसतात.

तसे केस करायला त्यांना ४० पाऊंड पर्यंत भरावे लागतात.असे केल्याने तुम्ही पैसे वाचवता ? तेव्हा या सर्व गोष्टी तुमचे चित्त सत्यापासून. उच्च मूल्यांपासून. मूर्खपणाकडे वळविण्यासाठी केल्या जातात. सहजयोगामध्ये सुध्दा लोकांनी सामूहिकतच राहायला शिकले पाहिजे.आपण सामूहिकतेत असणं फार महत्वाचे आहे.हे माझं आहे. हे माझं आहे. हे माझ्या मालकीचे आहे.असे आपण कधीच म्हणू नये.अगदी मुलांच्याबाबतीत सुध्दा तुम्ही असे करू नये. हा माझा मुलगा आहे हा माझा भाऊ आहे. ही माझी बहिण आहे हे माझं, माझं निघून गेलं पाहिजे.परंतु हे शक्य नाही हे विसरणे सोपे नाही. कारण ह्यासाठी आपली डावी व उजवी नाभी व्यवस्थित असणे आवश्यक आहे. ह्यासाठी, "आई हे सर्वकाही तुझेच आहे." असे म्हणणे हाच एक मार्ग आहे. हे असे म्हणण्यात काही धोका नाही कारण जे तुमचे आहे ते मी कधीच घेणार नाही हे फक्त सुरू करण्यासाठी असे म्हणा की " आई हे सर्व काही तुझेच आहे." हे सर्वकाही तुझेच आहे." मी तुझाच आहे. माझे हृदय तुझेच आहे, माझे सर्वकाही तुझेच आहे. माझे जीवनही तुझेच आहे. ह्या सहस्त्राराची देवता अगदी साधी आहे. खरोखरच साधी आहे.आणि ती छोट्यारया कार्यामुळे लगेच प्रसन्न होते. थोडसं इकडे तिकडे करण्यानी तिला प्रसन्न करता येते. तिला प्रसन्न करण्यासाठी काहीच विशेष प्रयत्न करावे लागत नाहीत.ती अत्यंत साधी आहे.व लहान लहान गोष्टीसुध्दा तिला आनंदित

करतात,काल तुम्ही माझ्यासाठी फुले आणलीत व मी ती घेतली नाहीत. इतक्या वेळ आपण फुले घेऊन बसलो आहोत पण श्री माताजींना का देऊ शकत नाही ?" असा विचार तुम्ही नक्कीच केला असेल.मला हा चमत्कार तुम्हाला दाखवायचा होता म्हणूनच मी ती घेतली नाहीत,आणि अगदी शेवटी ती घेतली,आणिआता पहा सर्व फुलांमध्ये ती किती सुंदर दिसाहेत ! नुकतीच झाडवरून तोडून आणल्यासारखी टवटवीत दिसताहेत. फक्त तुम्हाला हे दाखविण्यासाठी मी म्हणाले " मी आता दमले आहे " मी खाली बसले व तुमच्याकडे पाहिले तेव्हा तुम्ही सर्वजण हातात फुले घेऊन बसला होता,तेव्हा ती लीला विनोदिनी आहे आणि तुम्हाला धडा शिकविण्यासाठी विविध लीला करीत असते. कारण जेव्हा मी तुम्हाला एखादी गोष्ट करायला सांगतेतेव्हा तुम्ही ती करीत नाही.परंतु जरा आडमार्गाने जाऊन मी तुम्हाला दाखविते की ही गोष्ट चुकीची आहे. हे तुम्ही करू नये.यामध्ये वाईट वाटण्यासारखे काहीच नाही. मला सर्व फुले घेता आली असती. परंतु कुणीतरी नक्कीच विचार केला असेल की श्री माताजींनी फुले का घेतली नाहीत ? तुमच्या मनांत असा विचार आला किंवा नाही हे मला माहित नाही पण मला स्वतःला माहित होते की हा चमत्कार त्यांना दाखवायला मला ही फुले घ्यायची आहेत. आणि ती फुले आता सर्वांत जास्त वेळ टिकतील कारण ती आता ब्रह्मचैतन्याने (Vibrate) झाली आहेत. मी गरम पाण्याचा नळ उघडूनसुध्दा नळाला थंड पाणी आले.

अशा प्रकारे अनेक चमत्कार ह्या ब्रह्मचैतन्याचे तुम्ही बघितले आहेत की जे तुम्ही काढलेल्या फोटोमध्ये दिसतात. तुमच्या जीवनात तुमच्या स्वतःमध्ये जो बदल घडतो त्यामध्ये दिसतात. तुमच्या कुटुंबामध्ये तुमच्या प्रत्येकामध्ये दिसतात.तुम्ही ब्रह्मचैतन्यामध्ये असल्यामुळे हे सर्व काही घडत आहे. तुम्हाला हे सर्व काही मिळत आहे. कारण ब्रह्मचैतन्यानी तुम्हाला आशिर्वाद दिले आहेत, दुसऱ्यांना नाही, कारण ते एका वेगळ्याच जगात आहेत असाच तुमचा त्यांच्या बद्दलचा दृष्टीकोन असला पाहिजे.काय करायचं ? त्यांना कशी मदत करायची ? शक्यं झाले तर एका मर्यादेपर्यंत आपण त्यांना मदत करायची.दुसऱ्यांसाठी आपण स्वतः खाली ओढले जायचे नाही. एका मर्यादेपर्यंतच आपण त्यांना मदत केली पाहिजे.ही आनंदाची गोष्ट आहे की सहजयोग हा खूपच पसरत आहे. परंतु त्याची उंची वाढविण्यासाठी आपल्याला आपला दर्जा वाढवायला हवा.जर काही व्यक्ति उच्च स्थितीला गेल्या तर इतरही जाऊ लागतील. त्याचे बरोबर तेथे हेतुचा प्रामाणिकपणा हवा आणि अतिशय समजूतदारपणा हवा.एकमेकांसाठी हृदय उघडा म्हणजे तुम्ही माझ्यासाठी तुमचे हृदय उघडाल. प्रत्येक पेशी दुसऱ्या पेशीला माहित हवी नाहीतर हे घडणार नाही.

ही अतिशय महान घटना घडली आहे की तुम्ही ह्या पृथ्वीवर असताना हे महान आशिर्वाद तुम्हाला मिळत आहेत. किती तरी संताना ते मिळाले नाहीतकितीतरी महान व्यक्ती ह्या पृथ्वीवर होऊन गेल्या त्यांना सुध्दा ते मिळाले नाही. जे अवतार ह्या पृथ्वीवर होऊन गेले त्यांनासुध्दा तुम्ही जे करत आहात, ते करता आले नाही. तेव्हा स्वतःच्या आत्म्याच्या पात्रतेची, क्षमतेची, समाधान व वैभव प्राप्त करून घ्या,इतर लोक तुमच्या पातळीचे नाहीत तेव्हा त्यांना विसरून जा.पण त्यामुळे तुम्हाला अहंकार होऊ देऊ नका तर तुमचे व्यक्तिमत्व असे घडू द्या की जे कशाचीही प्रतिक्रिया करणार नाही. आपल्या जवळ आपल्या स्वतःचे असे काहीतरी आहे। आपण प्रतिक्रिया करू नये.आपण प्रतिक्रियावादी नाही. ज्या गोष्टी त्रासदायक आहेत त्या नष्ट होतील. सर्व काही उत्तम, व्यवस्थित होईल.कारण आपण स्वतःच्या पूर्णत्वात व वैभवात उभे आहोत. आता आपल्याला कशाची गरज आहे ? कशाचीही नाही.फक्त स्वतःच्या आत्म्याचा आनंद घ्या.

" परमेश्वरांचे तुम्हा सर्वांना आशिर्वाद "

# श्री कृष्ण पूजा

## प.पू.श्री माताजी निर्मलादेवीचे भाषण (सारांश)

### कबेला; इटली १५ ऑगस्ट १९९३

आपण नीट समजून घेतले पाहिजे की श्रीकृष्ण हे आपल्या अंतरंगातील फार महत्वाचं दैवत आहे आणि त्यांच वास्तव्य आपल्यामधे भवसागरामधील नाभीत आहे. त्यांच्याकडूनच आपल्यामधे धर्म जागृत होतो. तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळाला तेंव्हा "हे करा, ते करुं नका, हे चांगल आहे ते वाईट आहे" वगैरे काही मी तुम्हाला सांगितलं नव्हत. श्री विष्णु तुमच्यामध्ये जागृत झाल्यामुळे ते तुम्हांला आपोआप समजूं लागलं. ते जागृत झाल्यावर तुमच्यातील अज्ञान अंध:कार नाहीसाच होतो. तुमच्या लक्षात येतं की आत्तापर्यंत तुम्ही करत होता ते विनाशकारी होतं आणि त्यातून तुमच्यांत धर्म प्रस्थापित होतो. हे खरं आहे की या पृथ्वीवर जन्मलेल्या दहा अवतारांनी (गुरुंनी) धर्माची स्थापना केली; आपल्याला धर्म सांगीतला आणि अशा तऱ्हेने श्रीविष्णु आणि दहा गुरुंनी आपल्यामध्ये धर्म प्रस्थापित केला. कांही एका स्थितीपर्यंत येशू ख्रिस्ताने पण हेच कार्य केलं जेंव्हा ते म्हणाले "तुमच्या नजरेत पाप असता कामा नये."

श्री कृष्ण पण म्हाणाले कीं जेव्हां जेव्हां या पृथ्वीवर धर्माचे अध:पतन होईल तेंव्हा माझा अवतार होईल." आणि मग ते धर्माच्या अवनतिला कारण असलेल्यांचा नाश करतात. दुसरं - त्यांनीसागितलं कीं " मी संतांच सदैव रक्षण करतो आणिदुष्ट, पापी, आणि विनाशकारी सर्व लोकांचा नाश करतो." धर्म देणारीदेवता म्हणून आपण त्यांना विष्णु-स्वरुपात जाणतो, या सर्व शक्तिंचा श्री कृष्णाच्या जीवनांतून आपल्याला अनुभव येतो. श्री रामाच्या काळी अशा गुणांचा आविष्कार होऊ शकला नाही.

श्री कृष्णांच्या जीवनातील पहिला काळ गोकुळ आणि वृदांवन मधे गेला त्यावेळी त्यांनी आपल्या विविध "लिलांमधून" आपली ओळख दाखविली. ते म्हणाले" तुम्ही फक्त साक्षी व्हा." निरागस लहान मूल जसं प्रसन्न आणि आनंदी असतं त्या प्रमाणे तुम्ही जगाकडे पहाल तरच तुम्हाला जीवनांतला खरा आनंद सापडेल. त्यावेळी तुम्ही गोकुळ आणि वृंदावनाचे रहिवासी झाल्यासारखे व्हाल. कालिया, पुतना अश्यांना मारुन त्यांनीआपल्याला समजाऊन दिलं कीं आनंदी आणि इश्वरी माणसांच ते नेहमीच संरक्षण करतात व त्रासदायक दुष्ट शक्तिंचा ते नाश करतात. नंतर ते राजे झाले आणि त्यांची शक्तिदुसऱ्या कार्याकडे वळली. त्यांचे मामा आईचे भाऊ कंस, हा फार दुष्ट होता. श्रीकृष्णानी त्याला ठार मारलं. राजा होण्याआधी पण त्यांनी अशा

दुष्ट माणसाना ठार मारलं. त्याचा अर्थ काय? आता ख्रिस्त आणि इतर संत सुध्दा दयाळू होते.पण श्री कृष्ण त्या बाबतीत वेगळे होते.त्यांनीच फक्त म्हटले होते " मी शिक्षा करणारच." असा शिक्षा करणारा कोणीतरी हवांच नाही कां ! शिव हे त्याच्या नेमके उलटे होते. राक्षस सुध्दा त्यांना आवडायचे, त्यांना (राक्षसांना) त्यांच्याकडून (शिवांकडून) वरही मिळायचे.राक्षस हा राक्षसच असतो आणि त्याला ठार मारणच योग्य आहे. अशा कडक स्वभावाची व कठोर प्रवृत्तीची कोणी व्यक्ति असणं हे पण तितकच महत्वाच आहे. पण आपण माणसच आहोत, श्री कृष्ण नाही म्हणून आपण अशा व्यक्तिला क्षमाच केली पाहिजे.एकदा क्षमा केली की आपण आपला सर्व राग, सुडाची भावना ही श्री कृष्णाला अर्पण करायची. ते सर्व बघून घेतात.योग्य आणि जरूर असेल तर संताना त्रास देणाऱ्या व धर्मविरुध्द शक्तिंचा नाशच करतील आणि दुष्टाना शिक्षा करतील.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे एकादी व्यक्ति कांही शिकवण देईल तर त्याच ठिकाणी त्याला विरोध होऊ लागतो.जसं ख्रिस्तांनी सांगीतल "तुमची नजर पापी असता कामा नये " तर ख्रिश्चन माणसाचीच नजर सर्वात वाईट असते.तसच हिंदू धर्म सांगतो कीं सर्वामधे अेकच आत्मा आहे तरी हिंदूमध्येच जातीपाती खूप आहेत. आणि ते भांडत असतात.मोहम्मद साहेबांनीही करुणेची शिकवण दिली त्यांनीशरियत सांगितली नाही किंवा मुसलमान लोकांत काही असे प्रथात आहेत जे त्यांनी सांगितलेच नव्हते. स्त्रियांनी बुरखा वापरावा असं त्यांनी कधीच म्हटलं नाही.पण ती पध्दत ते लोक पाळतातजसे प्रकार जेव्हा होतात तेंव्हा धर्म विलयाला जाऊ लागतो.

तुम्हाला माहीत आहे की अमेरिका हा श्री कृष्णांचा देश आहे.अमेरिकेत त्यांचच राज्य आहे.श्रीकृष्ण कुबेर आहेत म्हणून तीथे खूप श्रीमंती आहे.त्यांचा दुसरा गुण म्हणजे ते दुसऱ्याच्या अंतरंगात पोहोचतात. गोप गोपींबरोबर ते खेळले आणि आपली शक्ति त्यांना दिली. त्यांची ही परस्पर संबंध निर्माण करण्याची शक्ति अमेरिकेत कार्यरत आहे. पण ते लोक उलट दिशेला चालायला लागले आहेत. सद्दाम हुसेन बरोबर असो नाहीतर कोरियांत असोयुध्द झालं की अमेरिका चालली. कोठेही कांहीही प्रश्न निर्माण झाला की अमेरिका पुढे. कोणी म्हणेल तुम्ही कोण ? तुम्ही कां मधे पडता? तुम्ही तुमच्या देशातच रहा आणि मजा करा एवढंच नव्हे तर () यूनो ची स्थापना झाली ती सुध्दा अमेरिकन लोकांच्या प्रभुत्वाखाली.

खरं पाहिलं तर श्रीकृष्णानी सांगितलेली मुख्य शिकवण ते विसरले आहेत. परस्पर संबंध निर्माण करुन दुसऱ्या देशाबरोबर कायम मैत्री करण्यामधे ते हुशार आहेत पण सगळ्यांत दुर्दैवाचीगोष्ट म्हणजे धर्म काय, नीतीमत्ता कशाला म्हणतात यांची त्यांना अजिबात कल्पना नाहीत्यांच्या लोकशाहीत नितीमूल्यांना स्थान नाही. नीतीमत्तेबद्दल अमेरिकेत नुसत बोलणही कुणाला आश्चर्य वा वेडेपणा वाटेल.पण आंता त्यांना त्यांच्याच चुकांचे दुष्परिणाम भोगावे लागत आहेत.नीतीशून्य जीवनामुळे त्यांच्यातील पासष्ठ टक्के लोक कोणत्याना कोणत्या आजाराने पछाडलेले आहेतत्यातील अकाली मृत्युमुखी पडल्यासारखे आहेत. या गोष्टी आता त्याना समजू लागल्या आहेत, तरी सुध्दा ते आपल्या संवयीतच गुरफटत आहेत : ठीक आहे फिकीर कशाला करा अशी वृत्ती अजून जात नाही.

आता शिक्षेची वेळ आली आहे.आतां समजा एकदा अनीतिमान, पापी जीवनच काढतोय आणि त्यामुळे त्याला असाध्य रोग झाला आहे. अशा नीतीशून्य जीवनातून उद्‌भवणारे आजार तऱ्हतऱ्हेचे औषधोपचार करुनही बरे होत नाहीत.त्यावर औषध शोधून ते बरं करण अमेरिकेतील वैद्यक शास्त्राला अशक्यच आहे. पण त्याहून दुर्दैवाची गोष्ट म्हणजे नीतीमत्ता न पाळण्यामधे कांही चूक आहे हेही मानणार नाहीत. हे प्रश्न आपल्या नीतीशून्य जीवनामुळेच आले हेही ते प्रांजळपणे कबूल करणार नाहीत. अशा तऱ्हेने या नीतिशून्य अवस्थेकडे कुणाचं लक्ष नाही. आणि हे श्रीकृष्णांचा देश असूनही ! म्हणूनच ते धर्म पस्थापित

करतात. मुसलमान, ख्रिश्चन, हिंदू लोकांच्या या बाबतीतील कल्पना म्हणजे कृत्रिम नीतिमत्ता आहे.तो दिखाऊपणा आहे बोलताना मोठ्या गोष्टी सांगायच्या आणि वर्तनमात्र त्याच्या उलट. अमेरिकेत मात्र हा प्रकार नाही. एका अर्थाने ते सरळ, खुले आहेत; काही लपवून ठेवायच त्यांना पटत नाही नुसता पोकळ दिखाऊपणा मानत नाहीत. अशा या महान, सुंदर, समृध्द आणि श्रीमंत देशाची अशी दशा झाली आहे की सहजयोगात अजूनही नाही आले तर ते कसे सुधारणार, मला समजत नाही.

धर्मानुसार वागणारा माणूस स्वत:वीच प्रमाणिकपणे परिक्षा करतो.धर्मामुळेच ही क्षमता मिळते.असा माणूस वागतांना हे बरोबर आहे नां, कुठे काय चुकत नाहीना या बद्दल काळजी घेतो. तो चुकीच्या कृतीचे समर्थन करण्याच्या भानगडीत पडत नाही. तो सहजयोगी नसेलही पण तो आपलं वागण बरोबर आहे की चूक या बद्दल जागरुक राहील. पण अमेरिकन लोकांत ही क्षमता नाहीशी झाली आहे. ते कधीही स्वपरिक्षा करणार नाहीत: उलट नेहमीच उत्तर देतील " मग काय झालं "अशा वागणुकिमुळे लोकांच अध:पतनच होणार.स्वपरिक्षेतूनच तुमची जाणीव उन्नत होते आणि मग तुम्हाला हे चूक आहे हे समजते. बाहेरच्या सर्व गोष्टी वरवरच्या आहेत पण तुमच्या अंतरंगातील कार्य अशा उन्नत जाणिवेतून व स्वपरिक्षेतून चालत. पुष्कळजण म्हणतात ही जाणीव काय आहे ? जाणीव ही नेहमीच, सदैव आहेच पण ती तुमच्यात प्रत्यक्ष उतरायला हवी. ही जाणीव म्हणजे श्रीकृष्णांकडून आपल्या आंत मध्ये असलेला प्रकाश जो तुमच्यामध्ये साक्षात्काराच्या आधी पासूनच आहे.कुडलिनीच सुषुम्ना नाडीतून उत्थान होते ते श्री महालक्ष्मीच्या आशीर्वादाने. तीच श्रीकृष्णांची शक्ति आहे.तुम्ही तुमच्या जाणीवेबद्दल जागरुक असलात की या महालक्ष्मी शक्तिचा मार्ग मोकळा होतो.ही जाणीव तर्क-वितर्कांच्यापलीकडे आहे आणि तिचाच आपल्याला आधार आहे. फार पूर्वि जेव्हा अनेक वंशाच्या लोकांनीदुसऱ्या देशांवर आक्रमण करुन सत्ता काबीज केली त्यावेळी अमेरिकेनेमात्र आपल्या सरहद्दी बाहेर जाऊन साम्राज्य स्थापण्याचा कधीही विचार केला नाही.

त्या काळी त्यांनी असा प्रयत्न कां केला नाही ? कारण त्याकाही जाणीवेच्या ऊच्च स्तरावरचे अनेक थोर महापुरुष तिथे जन्माला आले, आणि त्यांनी या राष्ट्राचा संभाळ केला. उदा. जॉर्ज वॉशिंगटन, अब्राहम लिंकन इत्यादी आणि त्यांनी आपल्या राष्ट्राला बाहेरचे प्रदेश पादाक्रांत करण्याच्या मोहात पडू दिले नाही. प्रथम स्पॅनिश लोक तिथे गेले मग इतर लोक पण आले. त्यांनी तो प्रदेश जिंकून आपली सत्ता तिथे प्रस्तापित केली. आणि त्यांचा काळ संपला. मग ते स्वातंत्र्य, लोकशाही इत्यादी मूल्यांबद्दल बोलू लागले. पण त्यांच्या पूर्वसंचितामुळे आणि त्यांनी पुष्कळ रेडइंडियन लोकांना ठार केले असल्यामुळे श्रीकृष्ण त्यांना क्षमा करणार नाहीत, जो पर्यंत ते सहजयोग घेत नाहीत.जरी त्यांनी बाहेरील प्रदेश काबीज करुन आपलं साम्राज्य वाढवलं नाही तरीही. जरी ते नेहमी न्यायाच्या बाजूने उभे राहीले तरीही वरवर पाहतां सबंध जगाला (मानव समुदायांना) एकत्रित आणण्याचा त्यांनी देखावा केला, वर्णपध्दतीला आणि धर्मवेडेपणाला त्यांनीविरोधकेला, एक प्रकारच्या आदर्शवादाचा प्रचार केला आणि नंतर स्वत:चाच विनाश करणाऱ्या कल्पना त्यांच्या डोक्यांत शिरल्या.

मी म्हणेण की त्यांच्या अशा कर्मामुळेच त्यांची अधोगती सुरू झाली. म्हणूनच दहशतवाद तिथे फार बोकाळला आहे. तऱ्हतऱ्हेचे आजार आहेत; आश्चर्याची गोष्ट म्हणजे हे सर्व प्रश्न अलिकडेच दिसू लागले आहेत. कारण आंता ते परिणाम स्वरूपवर येत आहेत. त्यांत भर म्हणून अनेक "अ-गुरु" तिथे आले आणि सत्याच्या शोधात असलेल्या साध्या व निष्पाप लोकांवर त्यांनी छाप पाडली.या शिवाय, पूर्वि त्यांनी ठार केलेल्या लोकांचे शिव्या-शाप त्यावेळच्या वातावरणांत होतेच.या सर्वांमुळे ते चुकीच्या मार्गाकडे वळले.त्यांच्या स्वत:च्या व्यक्तिगत आयुष्यातही ते अशा चुकीच्या मार्गाकडे कां

गेले ? त्यांना स्वातंत्र्य होतं पण त्याचाच दुरूपयोग करून स्वतःला आणि आपल्या बांधवाना विनाशकालाकडे नेण्यातही काय चूक आहे. अशा चुकीच्या वृत्तींच्या आहारी ते गेले. मगहीच प्रवृत्ती सामूहिक झाली उदा. हॉलिवूड, गुंडगिरी आणि दहशतवाद यामधून संहारक संघटना उदयास आल्या. त्या स्वतःलाच सैतानी म्हणून घेऊ लागल्या अशा संघटना, जादूटोणा करणाऱ्या संस्था तिथे राजरोस रजिस्टर होतात.

इतक्या थरापर्यंत जे लोक गेले आहेत आणि त्यांची सामुहिकता पण तशीच झाली आहे हे सर्व त्यांना केलेल्या शिक्षेमुळे झालं म्हणून सहजयोग अमेरिकेत पसरण अवघड आहे. आपल्याला त्यांच्या बद्दल सहानुभूति असायला हवी. ते त्यांना झालेली शिक्षा भोगत आहेत कारण त्यांच्या पूर्वजानीखूप चुका केल्या आणि जीवनांत धर्माची पूर्ण उपेक्षा केली. त्यांना वाटत होत की धर्म त्यांच्या स्वातंत्र्यांच्याआड येईल: धर्मामुळे त्यांच्याव्यक्तिगत जीवनांत अडथळे येऊन त्यांच्या मनासारखं जगतायेणार नाही.आता अमेरिकेत धर्म कसा प्रस्थापित करता येईल ? मी रशिया पेक्षा दसपट जास्त वेळा अमेरिकेचे दौरे केले आणि कसंही करून त्यांनी धर्माची उपेक्षा केली ही त्यांची चूक त्यांना दाखवून द्यायची आहे: पण ते फार अहंकारी असल्याने त्यांना हे कधी पटणार नाही. रजनीश सारख्या लोकांनीत्यांच्या अहंकाराला खतपाणी घातलेल त्यांना आवडत, त्यांच शिक्षा भोगणं चालूच आहे ही पण एक अडचण आहे. ते सहजयोगी झाले तरच त्यांची शिक्षा संपणार आहे. सहजयोगातूनच त्यांच्या मधे धर्म जागृत होऊन त्यांची शिक्षा व त्यांचे सर्व प्रश्न संपणार आहेत. जगातल्या कोठल्याही देशापेक्षा अमेरिकेला सहजयोगाची जास्त जरूरी आहे म्हणूनच मला अमेरिकेबद्दल जास्त काळजी वाटते.

दक्षिण अमेरिकेतल्या लोकांनाही धर्म म्हणजे काय याची शिकवण मिळालेली नाही. ते उत्तर अमेरिकेतील लोकांच्या पावलावर पाऊल टाकून चालले आहेत, उत्तर अमेरिकेत (Hallo well) हा एक मूर्खपणा आहे. म्हणून त्यांच्याकडे कार्निव्हल करतात. रिओला या कार्निव्हलला जाणं म्हणजे ते फार मोठी गोष्ट मानतात. सर्व दृष्टीनी तिथली परिस्थिती इतकी खराब आहे की ते लोक इतक्या टोकाला कां गेले आहेत हे समजत नाही.ब्राझीलमध्ये तेरा वर्षाच्या मुलीला उघडपणे वेश्या व्यवसायांत ढकलतात. ॲमेझॉनमध्ये सर्रास उघडपणे सर्व झाडं कापली जातात चोरटाव्यापार सर्रास चालतो, त्यांचे राजकारणी नेते भ्रष्ट आहेत. तिथे कॅथॉलिक चर्च आहे. ते कुठला धर्म त्यांना शिकवणार ? बरेचशे देश खूप गरिब आहेत. याचा अर्थ कुबेर त्यांच्यावर प्रसन्न नाही ये.

एरवी गरीब माणस धर्माचा आदर करणारी असतात पण येथील गोष्ट वेगळी आहे.

आपल्याला समज पाहिजे कीं त्यांच्या या प्रश्नांचा परिणाम आपल्या विशुध्दी चक्रावर होतो.आपलं विशुध्दी चक्र ठिक ठेवण जरुरीच आहे. या चक्राला दोन बाजू आहेत. उजव्या बाजूकडून धर्म मिळतो. ही बाजू प्रभावी आहे असं म्हणूया जे लोक प्रभावीपणा दाखवतात. त्यांच्या बोलण्यात अधिकार असतो. जे बोलताना दुसऱ्यावर प्रभुत्व दाखविल्या सारखे वागतात. ते लोक उजव्या बाजूचे होतात. समजा तुमच्या नोकराने चोरी केली आणि तुम्ही त्याला तसं सांगितलं, तो इतक्या उध्दटपणे उत्तर देईल की चोरी करूनच्या करून ती कबूल करण्याऐवजी बेडरपणे उलट उत्तर देईल. हे मोठं आश्चर्यच आहे. उजव्या बाजूचे लोक बोलताना नेहमी अशाच तऱ्हेने वागतात. अशीच भाषा वापरतात. त्यांची भाषा जोरदार. ठणकावून सांगीतल्या सारखी असते कीं तुमचा विश्वास बसणारच अशा तऱ्हेने आपण साधी माणसं मूर्खपणाच्या कितीतरी गोष्टी करतो आणि मग त्यांचं समर्थन करति बसतो. पण अशा लोकांना समजत नाही की ज्या कांही चुका केल्या आहेत त्याबद्दल तुमची क्षमा केली जाणार नाही आणि अशा वागण्या बोलण्यांनं तर कधीच नाही. तुम्ही प्रत्येक गोष्टी बद्दल वाद घालून समर्थन करायचा प्रयत्न कराल तर तुम्हाला एवढी शिक्षा मिळणारआहे की त्यातून सुटका होणं अवघड होईल. शारीरिक, मानसिक, भावनिक अशा सर्व शिक्षा तुम्हाला होतील. म्हणून उजव्या शुध्दीच्या शुध्दतेसाठी आपला स्वभाव, व्यवहार, वागणूक व गुण असे व्हायला हवेत की त्यामधून श्रीकृष्णांची नाद माधुर्यता प्रतिबिंबित होईल. आपलं बोलणं सुध्दा नेहमी नादमधुर असायला हवं, जो कोणी तुमचं बोलणं ऐकेल त्याला श्रीकृष्णाच्या बासरीची

मधुरता जाणवेल.सहजयोगी माणसाचा अवाजच मधुर हवा, रागीट, टोचून दुसऱ्याला लागेल असा नसावा. दुसऱ्याला लागेल असं बोलणं ज्यांची उजवी विशुध्दी ठिक आहे त्यांच्या कडून होणार नाही.दुसऱ्याला आपण कोठल्याच तऱ्हेने दुखवू नये. सर्व सहयाव्यांच्या आवाजांत विशुध्दी उत्तरोत्तर जागृत होऊन श्रीकृष्णाच्या बासरीची मधुरतायावी् असं मलावाटतं. तुमच्या वागणुकितूनही तुम्ही नुसत्या हावभावातूनही ही मधुरता व्यक्त करूं शकता.इटलीमध्ये हाताचा फारचा उपयोग करतात.हातांचा उपयोनही ही मधुरता दाखविण्यासाठीच व्हावाऱ्रशिया आणि पौर्वात्य देशातील लोकांच माझ्यावरती प्रेम त्यांच्या डोळ्यातूनही व्यक्त होतं. तुमचे डोळे . चेहरा हात . अश्रू हे सर्व श्री कृष्णांचीदेणगी आहेत. तुम्ही डोळ्याचा वापर करूणेसाठी किंवा राग दाखविण्यासाठी करूं शकता.पुष्कळ लोक डोळयांचा उपयोग दुसऱ्यावर जरब बसवण्यासाठी किंवा त्याना तुच्छता दाखवण्यासाठी करतात. आपल्या नेहमीच्या वागणुकीतही प्रेमळपणा . मधुरता असायला हवी. ही मधुरता .प्रेमळपणा . गोडपणा हीच शक्ति आहेतुमचेसंबंध इतके आपुलकीचे हवेत कीत्यातून खूप आनंद आणि समाधान पसरलं पाहिजे.निसर्गातील हिरवळ . झाडांकडे बघत राहण्याची सवय करा म्हजणे तुम्हीपण शांत सुंदर व्हाल दुसऱ्या बरोबरबोलताना पण त्या व्यक्तिकडेही शांतता पोहाचवा: ती व्यक्ति लगेच विरघळेल. तुम्ही त्याच्याशी वाद घालत. भांडत बसाल तरतो असा विरघळणार नाहीच उलट तो आणखी जास्तच विरोधात जाईल.

आपल्या उजव्या विशुध्दीतून मिळालेला श्रीकृष्णाचा दुसरा गुण म्हणजे चातुर्य.त्याचे दोन प्रकार आहेत एक स्वाभाविक असतं दुसर कृत्रीमपहिल्या प्रकारांत तुमच्याजवळ काही विशिष्ट गुणवत्ता लागत नाही की पुस्तकी ज्ञानही लागत नाहीसर्व कांही आपोआप सुरळीतपणे पार पडतं.तुम्ही राग सोडून दिलात तरच हे शक्य होत.आपण दुसऱ्यालापूर्णपणे आपलस करून घ्यायचं असतं म्हणजे बुध्दी प्रदर्शनाने वा अधिकारीपणाने दुसऱ्याला पटवणं नव्हेउलट आपल्यातील चांगुलपणानेच म्हणजे बुध्दी प्रदर्शनाने वा अधिकारीपणाने दुसऱ्याला पटवणं नव्हे. उलट आपल्यातील चांगुलपणानेच. वागण्यातील गोडव्याने व क्षमा शिल होऊन दुसऱ्याला जिकंणे. श्रीकृष्णांजवळ हे गुण होते. त्यांच्यामुळे काहिलोकांवर परिणाम झाला. काहिवर नाही तरी त्याच त्यांना अपयश वाटलं नाही ती फक्त त्या व्यक्तिची प्रतिक्रीया होती.

मला वाटतं अमेरिकेतील लोक हा गुण आत्मसात करतील आणि एकमेकांतील संबंध सुधारतील.जो पर्यंत तुम्ही काम कराल तो पर्यंत ते तुमच्याशी मैत्री ठेवतील. पण त्याची परफेड करण्याची वेळ आली की त्यांची फार पंचाईत होतेवागण्यांतील गोडव्यामुळे तुम्हाला कसलाही गैर फायदा करून घ्यायचा नसतो; उलट त्या गोडव्यातून तुम्ही दुसऱ्याला अशा स्थितीत नेता की त्याला चांगुलपणा म्हणजे काय ते कळेल.

दक्षिण अमेरिकेतील लोक अगदी साधे भाळे-भाबडे वगरीब आहेत पण आता त्यांच्यात मंत्र विद्येचा (काळी विद्या) शिरकाव झाला आहे. त्यांना आता ह्या काळ्या विद्येचादोष समजलाआहे व त्यामुळे ते स्वतःला अपराधी समजतात त्यांच सर्व वागण आपण एकादी मोठी घोडचूक केल्या सारख आहेत्यातून कसं सुधरायच हेच त्याना कळेनास झाले आहे. आपण स्वतःला कसल्याही प्रकारे अपराधी न समजण हे फार महत्वाचं आहे.आपण सारे सहजयोगी आहोत . आंता सर्व आत्मा झालो आहोत. आत्म्याला कसला दोष लागत नाही. अपराधी भावनेमुळे आपला साक्षीभाव नाहीसा होतो: कुठं काय चुकलं आणि आपल्या चुकांतून आणि अडचणीतून कसा मार्ग काढायचा हे आपल्याला साक्षी होऊन पाहणं कळत नाही.उदाहरण पहा.एकादा पुरूष वा महिला फार क्रूर स्वभावाची आहे . मग त्या व्यक्तिला आपला क्रूर पणा समजतो. मग ती आपण खूप वाईट आहोत अशी ठाम भावना करून घेते. पण त्याला कसं तोंड द्यायचं हे त्याला उमजत नाही.हे उमजणं म्हणजे आपण क्रूर का आहोत. क्रुरपणा हा वाईट गुण आहे आणि आंता या पुढे मी क्रुरपणे वागणार नाही हे सर्व समजण.

रशियाची गोष्ट वेगळी आहे.ते स्वतःला कधी दोषी समजत नाहीत . ते म्हणतात आता तो काळ संपलाआहे. आताआम्ही परमेश्वरीयसाम्राज्यांत आलो आहोत . आता आम्हाला आनंद मिळत राहणार. ते भूतकाळाबद्दल काही बोलतच नाहीत. ते म्हणतात त्याच्याशी आमचा संबंध नाही.आम्ही त्याच्या पलीकडे गेलो आहोत.

त्याची काळजी नाही.त्यांना त्यांच्या प्रश्नाबद्दल कांही समजवून घ्यायच नाही.प्रश्नच संपले असं ते म्हणतात.ते आता पार झाले आहेत.सहजयोग समजून घेण्याचा हा एक साधा सुधा मार्ग आहे.तरी पण मला पाद्री समजून माझ्यापुढे दहा - दहा पानी आपल्या पापांची कबुली देणारे लोक मी पाहीले आहेत,अशा कबुली जबाबांची जरूर नाही ,आपलं काय चुकलं त्याची चर्चा करण्याचीही जरूरी नाही. आता तुम्हाला जे मिळालं आहे त्याचा आनंद घ्या.एखादा भिकारी राजा झाल्या सारख हे आहे. आता राजासारख रहायच. आणि राज्याचा उपयोग घ्यायचा, आता तो पूर्वीच आठवू लागला तर पुन्हा जाणाऱ्या येणाऱ्या समोर हात पसरेल. एकदा तुम्ही परमेश्वराच्या साम्राज्यांत आलांत की हे परमेश्वरी साम्राज्य आहे याचा विसर पडू देऊ नका.ही काळी (मंत्रविद्या) विद्या एक भयंकर प्रकार आहे, जो तुमचे मित्र, नातेवाईक अशा कुणाकडूनही काम करवते. स्वतःला अपराधी समजून आपण याकाळ्या विद्येला बळी पडणार नाही या बद्दल प्रत्येकाने काळजी घ्यायला हवी. ती तुमचा, तुमच्या कुटुंबाचा सर्वनाश करील.तुम्ही सहजयोगी असला तरीही स्वतःला दोषी समजू नका. दोष तुमच्या डोक्यांत भरवला जातो. कोणीतरी तुम्हाला म्हणतं. "तू फार वाईट आहेस, तूं माझं हे काम केलं नाहीस "ते अशा कल्पना तुमच्या डोक्यांत भरवल्या जातात व मग तुम्ही म्हणू लागता की "मी असं करायला हवं होतं. हे माझं चुकलं" मग हा दोषीपणा चालू होतो.

त्या माणसासाठी काही करण्याऐवजी किंवा हे सर्व निष्फळ आहे हे जाणण्याऐवजी ते दुःखी होत रहातात आणि एकदम त्यांच्या लक्षात येते की ते बाधिक झाले आहेत. किंवा गूढ विद्येच्या अंमलाखाली आले आहेत. त्यांनी ते विसरायला हव, आणि अशा वातावरणात यायला हवं की त्यांना आपण परमेश्वरी साम्राज्यात आहोत हे जाणवेल.

श्रीकृष्णाचे मुख्य कार्य मेंदूव्दारे होत असते,म्हणजेच विराटाव्दारे जस शिव आपल्या हृदयाव्दारे कार्यरत असतात.एकदा प्रकाशित झाल्यावर मेंदूची व ज्ञानाची गूढता व्यक्त होऊ लागते. सर्वात महत्वाचे म्हणजे तुमच्या मेंदूत एकात्मता व पूर्णता येते.तुमच्या हृदयाला एक गोष्ट हवी असते व मेंदूला दुसरी. असे होत नाही. जेव्हा ही एकात्मा येते. तेव्हा धार्मिकतेने वागणे खूपच सोपे पडते,जरी तुम्ही धर्माबद्दल विचार केला नसला व वाचले नसले तरीही तुम्ही सहजच धार्मिक बनता. कारण तुमचा मेंदू जो विचार करण्यासाठी आणि सर्व चुकीच्या गोष्टींच्या समर्थनासाठी वापरला जातो, तो मेंदूच धार्मिक बनतो. दैवी बनतो. श्रीकृष्ण तुमच्या बाबतील एक मोठे कार्य करतो ते म्हणजे तो तुमचा मेंदूच धार्मिक बनवून टाकतो. तो धर्मावर अधिष्ठीत आयुष्य जगण्याचे आणि धर्माची जाण असलेले वाहनच बनतो,असा मेंदू / जाण तुम्हाला काळ्या जादू पासून (Black Magic) दूर नेतो व त्याच्या संपर्कात येऊ देत नाही.एकदा कां तुमचे सहस्त्रार उघडले आणि विराट स्फुरले की तुमचे तुम्हीच गुंग होऊन जाता.जो एकदा सर्व गोष्टीत स्वैराचाराने वागत होता. विचार करत होता कि "हेच सुख आहे" हा माझा हक्क आहे. मी हे करायला पाहिजे होते. दुसरे कोण मला काय शिकवणार तोही एकदम बदलतो आणि इश्वराचा प्रेषित बनतो. श्रीकृष्ण हे विराट आहेत हेच त्यांचे तुम्हाला आशिर्वाद आहेत,विराट म्हणजे तुमचा मेंदू व परमेश्वराचा मेंदू हेच विराट आहे. आत्म साक्षात्कारा नंतर मनुष्यप्राण्याला नेहमी विधायक अशाच गोष्टी सुचतात आणि जर अशा गोष्टी सुचल्या नाहीत,तर मग तुम्ही सहज योगी नव्हेत,धार्मिक व विधायक गोष्टी समजणे हे आपल्याला फार महत्वपूर्ण आहे. माझं चित्त कोठे जात आहे ? ते वस्तु स्थिती आहे त्या पेक्षा काही निराळे सांगते आहे का ? कां ते विरुध्द कांही सांगते आहे का? आपल्याला फक्त त्यावर लक्ष ठेवले पाहिजे. आणि तुमची मती गुंग होऊन जाईल कारण तुमच्या मेंदूने त्याचा मार्ग बदललेला असेल.हे तुम्ही सहज मिळवू शकता, जर तुम्ही दर रोज ध्यान धारणा केलीत; आणि सहस्त्रारांचे तुमच्या अंतरंगावर होणारे परिणाम पाहिले: तुमच्या आयुष्याती घटनांमध्ये भाग घेते. असे जर झाले तर सहजयोग्यांच्या सर्व शक्ति प्रकट होतील व तुम्हाला तुमच्या बद्दल कोणतीच शंका घेण्याचे कारण उरणार नाही. आणि दुसरेही कांही शंका काढणार नाहीत.

**तुम्हाला परमेश्वराचे अनंत आशिर्वाद**

***

आता तुम्ही हे सत्य प्रकट सांगू शकता की तुम्ही आत्म साक्षात्कारी जीव आहात, सर्वत्र वास करत असलेल्या ईश्वरी शक्तिची तुम्हाला जाणीव झाली आहे, तुम्ही दुसऱ्याला आत्मसाक्षात्कार देऊ शकता आणि सत्याचा स्विकार करून तुम्ही सत्यामधे काही भर घालत नाही तर स्वतःला सुशोभित करता.

सत्याचा आनंद घेण्यास धैर्य लागते. काही वेळेस लोक तुमची टवाळी करतील, हसतील, कदाचीत त्रासही देतील. परंतु त्याची तुम्हाला काळजी नसावी कारण तुमचे नाते परमेश्वरी नियमांशी, परमेश्वराच्या कृपेशी आहे. तुम्ही त्यांच्याशी संलग्न झाल्यावर इतरांच्या बद्दल आणि त्यांना काय म्हणायचे आहे याची फीकीर करू नये. तुम्ही उभे राहून स्वतःला सत्याने सुशोभित करायला हवे;आणि लोकांशी बोलायला हवे मग लोकांना समजेल कि तुम्हाला सत्य मिळाले आहे.

-- श्री माताजी